नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०७/०६/२०२६ (रविवार)

# पोलीस ठाणे काटोल येथे जेसीबीचा वापर करून अवैध दारू विक्रेत्यांविरूद्ध राबवण्यात आली विशेष मोहीम
# १ लाख १७ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
# काटोल पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन काटोल :— दिनांक ०६/०६/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक रणजित शिरसाठ प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन काटोल यांच्यासह काटोल उपविभागातील अधिकारी आणि अंमलदार यांनी जेसीबीचा वापर करून विशेष मोहीम राबवुन मौजा पारधी बेडा डोंगरगाव व घुबडमेट येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्यांवर कारवाई केली. पोलीस पथकाने **आरोपी नामे १) गुलाब अमरया राजपुत, रा. डोंगरगाव, ता. काटोल, जि. नागपुर याच्यासह २) ०५ महिला आरोपी विरूध्द कारवाई करून गुन्हे नोंद** केले. पोलीसांनी घटनास्थळावरून मोहाफुल सडवा आणि मोहाफुल गावठी दारू आणि साहित्य जप्त करत घटनास्थळावरील रनिंग भट्टया नष्ट केल्या.

**सदर कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण १) २८०० लिटर मोहफुल सडवा २) ९० लिटर मोहाफुल गावठी दारू आणि प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, दारू गाळण्याचे साहीत्या असा एकुण १,१७,७००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ६ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**





# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, ०५ लाख १२ हजारांचा मुद्देमाल जप्त पारशिवनी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— दिनांक ०५/०६/२०२६ रोजी पारशिवनी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा डोमाजी महाराज मंदीर जवळ खंडाळा पारडी शिवार येथे नाकाबंदी केली असता संशयित POWERTRAC कंपणीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर व ट्रॉली क्रंमाक एम एच—४०/एल—८७९१ सह मिळून आल्याने चालकास त्याचें ताब्यातील वाहन रोडच्या बाजुला थांबायला इशारा केला असता ते न थांबता ट्रॅंक्टर सोडुन घटनास्थळा वरुन पळुन गेला.

**पोलीसांनी पंचासमक्ष** विना क्रमांकाचा ट्रॅक्टर व ट्रॉली क्रंमाक एम एच—४०/एल—८७९१ **किंमती ५००,०००/— रूपये आणि ०१ ब्रास रेती किंमती ६,०००/— रूपये, ०१ मोबाईल किंमती ६,०००/—रूपये असा एकुण किमती ५,१२,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी चालक लकी रा. निंबा ता. पारशिवनी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने